## -: इतिवृत्त :-

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ यांनी सन 2025-26 या वर्षासाठी K-2 कार्यालयीन इमारत व परिसराची साफसफाई करणेबाबत ई- निविदा सूचना संदर्भात प्रि-बिड सभा सभा दि. 28/08/2025 रोजी सकाळी 11.00 वा. मा. विभागीय सचिव यांचे दालनामध्ये मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली होती. सदर सभेस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| अ. क्र. | सभेस उपस्थित सदस्य |
|---|---|
| १ | श्रीम. ज्योत्स्ना शिंदे-पवार, मा.वि.सचिव (प्र) |
| २ | श्रीम. अश्विनी सुर्वे, लेखाधिकारी |
| ३ | श्रीम. कल्पना पवार, शाखाधिकारी भांडार/लेखाशाखा |
| ४ | मे. बालाजी सेक्युरिटी फोर्स, पुणे |
| ५ | मे. स्वामी सर्व्हिसेस, पुणे |
| ६ | मे. छत्रपती सेक्युरिटी फोर्स, लातूर |

प्रि-बीड सभेस उपस्थित निविदाकारांनी खालील प्रमाणे मांडलेल्या समस्यांवरती खालील प्रमाणे चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

| अ क्र | चर्चेचा विषय | झालेली चर्चा | घेतलेला निर्णय |
|---|---|---|---|
| 1. | संस्थेने निविदा रक्कमेच्या किमान 20 % रक्कमे इतपत Bank Solvency Certificate जोडणे आवश्यक आहे का ? | ई-निविदा सुचनेच्या पृष्ठ क्र. 5 वरील मुद्दा क्र. 15 मधील संस्थेने निविदा रक्कमेच्या किमान 20 % रक्कमे इतपत Bank Solvency Certificate जोडणे आवश्यक आहे का ? असे मे. स्वामी सर्व्हिसेस, पुणे यांनी विचारले. Bank Solvency ची एकदाच एकत्रित रकमेची घेण्यात येते ती 20 % रकमेपेक्षा जास्तीची असू शकते. | ई-निविदा सुचनेच्या पृष्ठ क्र. 5 वरील मुद्दा क्र. 15 मधील संस्थेने निविदा रक्कमेच्या किमान 20 % रक्कमे इतपत Bank Solvency Certificate जोडणे आवश्यक आहे. तरी जास्त रकमेची असली तरी स्विकारण्यात येईल. |
| 2 | सेवा शुल्क दरGST रक्कमेसह आहे किंवा नाही ? अंदाजित किंमत GST रकमेसह आहे का ? | सेवा शुल्क दर व अंदाजित किंमत GST रकमेसह आहे किंवा कसे, असे मे. बालाजी सेक्युरिटी फोर्स, पुणे यांनी विचारले. | ई-निविदा सुचनेच्या पृष्ठ क्र. 5 व 6 वरील अ.क्र. 1 नुसार सेवा शुल्क दर (सेवा व वस्तू कर वगळून) नमूद करायचा असून अंदाजित किंमत (पृष्ठ क्र. 4 वरील अ.क्र. 1 नुसार) सेवा व वस्तू कर धरुन आहे. |
| 3 | साहित्याची किंमत जास्त असल्याबाबत | मे. स्वामी सर्व्हिसेस, पुणे यांनी निविदेत नमूद साहित्याचा खर्च अंदाजित किंमतीपेक्षा जास्त येणार असल्याचे नमूद केले. | ई-निविदा सुचनेच्या पृष्ठ क्र. 5 व 6 वरील (क) अ.क्र.1 व 2 नुसार तसेच पृष्ठ क्र. 23 नमुना 6 (भाग 2) नुसार किमान वेतन नुसार मनुष्यबळ पुरवठा, ओळखपत्र, साफसफाईचे साहित्य, गणवेश व सुरक्षित उपाय योजना इतर आवश्यक बाबींचा एकूण खर्च विचारात घेऊन सेवा शुल्क दर नमूद करणे आवश्यक आहे. |

वरील अ. क्र. 1 ते 3 मुद्दयाचे मा. विभागीय सचिव (प्र.) व लेखाधिकारी यांच्या मार्फत शंकेचे निरसन केले व ई-निविदा सुचना मधील पृष्ठ क्र. 09 वरील मुद्दा क्र. 04 वरील अटीनुसार उपस्थितीत निविदाकाराकडून निविदा भरण्यापूर्वी कार्यालयाची अंतर्बाहय सखोल पाहणी करुन पाहणीबाबतचा वस्तूनिष्ठ अहवाल निविदा सादर करण्यापूर्वी कार्यालयास देण्याबाबत व साफसफाई कामाचे स्वरुप समजल्याचे प्रमाणपत्र निविदा सादर करण्यापूर्वी देण्याबाबत नमूद केले आहे.

उपरोक्त प्रमाणे उपस्थित निविदाधारकांसोबत सांगोपांग चर्चा होऊन मा. विभागीय सचिव (प्र.), यांच्या मान्यतेने प्रि-बीड सभा दि. 28/08/2025 सभा सकाळी 11.40 वा. संपल्याचे जाहीर करण्यात आले. सदरील इतिवृत्त मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

शाखाप्रमुख शाखाधिकारी मा. लेखाधिकारी मा.सहसचिव/मा. विभागीय सचिव (प्र) विभागीय अध्यक्ष